राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत कंपोनंट डी करिता केन्द्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पाच्या बँक <u>खात्यात जमा करण्याबाबत..</u>

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)

शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र-२०१८/प्र.क्र.१०३/आव्यप्र-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- ३०.३.२०१९.

<u>वाचा</u> :-राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकार यांचे आदेश क्रमांक ४-१/२०१५- पीएमयू (व्हॉल्यूम.III)/ ४१६६-७२, दिनांक २२.२.२०१९.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत कंपोनंट डी करिता संदर्भाधिन आदेशान्वये केन्द्र शासनाकडून प्राप्त झालेला रु. १,००,००,०००/-(रुपये एक कोटी फक्त) एवढा निधी आहरित करुन राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पासाठी उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

वरील निधी आहरित करण्यासाठी श्रीमती वनिता बाविस्कर, लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग आणि श्रीमती राजश्री राऊत, वित्तीय सल्लागार व सहसचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांना अनुक्रमे आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

या कामी होणारा खर्च मागणी क्रमांक सी -६ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणसाठी सहाय्य (०८) प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रकल्प अंमलबजावणी गटासाठी सहाय्य (०८) (०१) प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रकल्प अंमलबजावणी गटासाठी सहाय्य (२२४५ २६२१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर आदेश वित्त विभागाच्या सहमीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७५/अर्थोपाय/दिनांक २९.३.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०३३०१४५१३५७२१९ असा आहे. हा आदेश डिजीस्टर स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.03.30 14:53:46 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
४) महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७) वित्तीय सल्लागार तथा सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
९) अर्थसंकल्प शाखा, ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) निवड नस्ती.